# नि. दि. मु. ७५/२०१३ मधील नि. १८१ वरील आदेश

**CNR-MHSN 14000335-2013**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे.

वादीचे थोडक्यात कथन असे की,

२. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी नं.१ यांनी दावा ब मिळकत एकत्र कुटुंबास कोणतेही कायदेशी गरज नसताना दोन मुलतः रद्दबातल खरेदीपत्राव्दारे प्रतिवादी नं.५ यांना विक्री करुन त्या रक्कमेतून प्रतिवादी नं.१ यांनी दिनांक २२/११/२०१३ रोजी रजिस्टर खरेदीपत्राने मौजे कोकरुड ता.शिराळा येथील घर मिळकत व खुली जागा खरेदी केली आहे. त्यास अनुसरुन वादी यास दावा मिळकत ब च्या वर्णनाखाली ''दावा क मिळकत''. तसेच दावा क मिळकतीच्या वर्णनाखाली जादा मजकूर नमूद करण्यास व दावा कलम ६ च्या सुरुवातीस ''प्रतिवादी नं.२ कृष्णा हे पुर्वी नोकरीस होते'' या वाक्या आगोदर जादा मजकूर लिहिण्यास परवानगी मागितली आहे. तसेच दावा कलम १४ चे शेवटी ''त्यामुळे सदरचे दोन्ही बंधनकार नव्हती व नाही'' या वाक्याखाली जादा मजकूर व दावा कलम १८ मध्ये दाव्याच्या आकारणीची दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. त्याचबरोबर दावा कलम २२ मध्ये उपकलम क मध्ये पहिल्या व शेवटच्या ओळीत ''प्रतिवादी नं.१ ऐवजी प्रतिवादी नं.१ व ५'' तसेच दावा कलम २२ उपकलम ड मध्ये चौथ्या ओळीत ''प्रतिवादी नं.१ व ५ ऐवजी प्रतिवादी नं.१'' अशी दुरुस्ती होवुन मिळावी याकरिता अर्ज केलेला आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून ती मंजूर झाल्यास

प्रतिवादीस कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जास नि.१८५ कडे म्हणणे सादर करुन वादीचा अर्ज मान्य व कबूल नसल्याचे कथन केले. तसेच याप्रकारची मागणी वादी यांना कायद्याने मागता येणार नाही. तसेच सदरहू दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलणार असून दाव्याच्या दादीवर परिणाम होणार आहे. जर अर्ज मंजूर करावयास झाल्यास वादीवर र.रु.१०००/– कॉस्ट बसविण्यात यावी अशी विनंती केली.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये वादी अथवा प्रतिवादी त्यांच्या कथनामध्ये दुरुस्ती करु शकतात. सदरची दुरुस्ती वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद समजवण्याजोगे व विचारांती असावी. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटपाचा, हक्कज्ञापनाचा व निरंतर मनाई मिळविण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी नं.१ ने दावा चालू असताना दावा ब मिळकत प्रतिवादी नं.५ यास विक्री करुन प्रतिवादी नं.१ ने २२/११/२०१३ रोजी त्याच्या नावे मौजे कोकरुड येथे घर मिळकत व खुली जागा खरेदी केल्याचे वादीचे कथन आहे. दावा चालू असताना एखादा व्यवहार अथवा बदल दाव्यामध्ये झाल्यास त्याची दुरुस्ती दाव्यात होणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद कायमपणे संपुष्टात व समजुन घेता येईल. वादीने मागितलेली दुरुस्ती ही औपचारिक असून ती मंजूर

होण्यास पात्र आहे. त्यामुळे दाव्याचे कोणतेही स्वरुप बदलणार नाही. परंतु वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करणेस विलंब केला असल्याने त्या विलंबास वादी हे खर्च देऊ लागतात. सबब, वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**– आदेश –**

१. वादीचा अर्ज नि .१८१, र.रु.३००/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने आज पासून १० दिवसांच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन तशी दुरुस्ती प्रत कोर्टामध्ये हजर करणेची आहे.

**सही/–**

दिनांक ०५/०१/२०१९ **(बी. आर. पाटील)**

शिराळा सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

शिराळा